राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे–३०.

'STARS' प्रकल्पांतर्गत

# पायाभूत चाचणी : २०२४–२५

## इयत्ता – पाचवी : विषय – मराठी (प्रथम भाषा)

## उत्तरसूची

## उत्तरसूची व गुणदानाबाबत सूचना

| तोंडी | लेखी | एकूण गुण |
|---|---|---|
| १० | ४० | ५० |

| तोंडी चाचणी | | | |
|---|---|---|---|
| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
| प्र. १) | **गोष्ट ऐक व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सांग.** | 04.01.01 | ५ |
| | • शिक्षकांनी विद्यार्थ्यांना इयत्ता ४ थी च्या पाठ्यपुस्तकातील पाठ क्र. १८, पान क्र. ६५ वरील 'जननायक बिरसा मुंडा' ही गोष्ट वाचून दाखवावी. | | |
| | • गोष्ट सांगताना आवाजातील चढउतार, विरामचिन्हे इत्यादींकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे. | | |
| | अ) बिरसा मुंडा यांचा जन्म सुगाना व करमी या आदिवासी दांपत्याच्या पोटी झाला. असे सांगितल्यास. | | १ |
| | आ) इतरांच्या/दुसऱ्यांच्या शेतात रोजंदारीवर काम करणारा असे उत्तर सांगितल्यास. | | १ |
| | इ) बिहारमधील भीषण दुष्काळामुळे. | | १ |
| | ई) आदिवासींना संघटित करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ब्रिटिश जमीनदार व जहागीरदारांविरुद्ध बंड पुकारले. अशा आशयाचे समर्पक उत्तर सांगितल्यास. यांपैकी एक वाक्य सांगितल्यास १ गुण. | | २ |
| प्र. २) | **शिक्षकांनी म्हटलेली कविता ऐक व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सांग.** | 04.01.02 | ५ |
| | • शिक्षकांनी विद्यार्थ्यांना इयत्ता ४ थी च्या पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ५७ वरील 'झुळूक मी व्हावे' ही कविता ऐकवावी. त्यानंतर विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वरूपात प्रत्येकी पाच प्रश्न विचारावेत. | | |
| | अ) बाजार व नदीकाठ हे शब्द वापरून अर्थपूर्ण वाक्य तयार करून सांगितल्यास. | | १ |
| | आ) सुगंध घेतलेल्या वस्तू/पदार्थांची २ नावे सांगितल्यास. सुगंध घेतलेल्या वस्तू/पदार्थाचे १ नाव सांगितल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| | इ) ओळीस अनुरूप अर्थपूर्ण प्रश्न तयार करून सांगितल्यास १ गुण द्यावा. | | १ |
| | ई) कळीला बोट लावून निघून जावे. असे उत्तर सांगितल्यास. | | १ |

| लेखी चाचणी | | | |
|---|---|---|---|
| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
| प्र. ३) | **खालील उतारा वाच व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** | 04.01.06 | ५ |
| | अ) पर्याय क्र. २) मुक्या प्राण्यांना संकटात मदत करणे. बरोबर उत्तर लिहिल्यास. | | १ |
| | आ) विद्यार्थ्यांनी मांजरांच्या ओरडण्याचा आवाज, त्याचे घाबरणे, इकडे तिकडे पाहत विचित्र आवाज काढत होते. अशा आशयाचे उत्तर लिहिल्यास.<br>वरीलपैकी १ वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| | इ) मुक्तोत्तरी कृती (अपेक्षित उत्तर : मदतीची भावना, पालकांना माहिती देणे, प्रत्यक्ष मदत करणे.) अशा आशयाचे विद्यार्थ्यांनी तीन ते चार वाक्यांत उत्तर लिहिल्यास.<br>एक ते दोन वाक्यांत उत्तर लिहिल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| प्र. ४) | **सूचनेनुसार कृती कर.** | 04.01.11 | ४ |
| | अ) १) सुरेल आवाज २) कथ्थक नृत्य ३) फळबाग<br>वरीलपैकी कोणत्याही दोन योग्य जोड्या लावल्यास २ गुण द्यावे.<br>दिलेल्या शब्दांची एक योग्य जोडी लावल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| | आ) शेतीच्या अवजारांची माहिती, शेती व्यवसायाची माहिती, शेतीचे उपयोग, शेतीतून मिळणारे अन्नधान्य.<br>• विद्यार्थ्यांनी शेती व्यवसायाविषयी तीन ते चार वाक्यांत माहिती लिहिल्यास. (वरील मुद्द्यांना अनुसरून) २ गुण द्यावेत.<br>• विद्यार्थ्यांनी शेती व्यवसायाविषयी एक ते दोन वाक्यांत माहिती लिहिल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| प्र. ५) | **सूचनेनुसार कृती कर.** | 04.01.12 | ९ |
| | अ) १) डोळे २) दिवस | | २ |
| | आ) १) बाग २) आकाश | | २ |
| | इ) कंसातील योग्य विशेषण वापरून खालील वाक्ये पूर्ण केल्यास पूर्ण गुण द्यावेत.<br>१) लाल २) हुशार (प्रत्येकी १ गुण) | | २ |
| | ई) दिलेले सर्वनाम वापरून दोन अर्थपूर्ण वाक्ये तयार केल्यास २ गुण द्यावेत.<br>दिलेले सर्वनाम वापरून एक अर्थपूर्ण वाक्य तयार केल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| | उ) विद्यार्थ्याने रिकाम्या जागी योग्य शब्द लिहिल्यास.<br>म्याऊऽऽम्याऊऽऽ | | १ |
| प्र. ६) | **कंसातील योग्य शब्द वापरून वाक्य पूर्ण कर.** | 04.01.13 | ४ |
| | अ) ढग | | १ |
| | आ) स्वस्थ | | १ |
| | इ) पुरस्काराने | | १ |
| | ई) माशाशी | | १ |
| | बरोबर उत्तरास प्रत्येकी १ गुण द्यावा. | | |

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
|---|---|---|---|
| प्र. ७) | **दिलेल्या सूचनेनुसार कृती कर.** | 04.01.14 | ५ |
| | अ) विद्यार्थ्याने निवासी आनंद मेळाव्याला जाण्यासाठी सोबत न्याव्या लागणाऱ्या<br>• ५ ते ६ वस्तूंची यादी केल्यास ३ गुण द्यावेत.<br>• ३ ते ४ वस्तूंची नावे लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>• १ ते २ वस्तूंची नावे लिहिल्यास १ गुण द्यावेत.<br>उदा. डायरी, पेन, ब्रश, साबण, टॉवेल, कपडे, सतरंजी, चादर इत्यादी. | | ३ |
| | आ) विद्यार्थ्याने चौकटीतील शब्द वापरून दोन अर्थपूर्ण वाक्ये तयार केल्यास.<br>• मुलाने किराणा दुकानातून खाऊ आणला.<br>• मुलगा खाऊ खातो.<br>अशा प्रकारे अर्थपूर्ण वाक्ये तयार केल्यास गुण द्यावेत. (प्रत्येक वाक्यास १ गुण) | | २ |
| प्र. ८) | **खाली दिलेली कविता वाच व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** | 04.01.16 | ५ |
| | अ) पुढीलपैकी शब्द वापरून दोन अर्थपूर्ण वाक्ये तयार केल्यास २ गुण द्यावेत.<br>१) लुकलुक – आकाशात तारे लुकलुकतात.<br>२) गोंडेदार – झेंडूची फुले गोंडेदार दिसतात.<br>पुढीलपैकी शब्द वापरून एक अर्थपूर्ण वाक्य तयार केल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| | आ) 'तरू' | | १ |
| | इ) बघणे, ऐकणे, करणे, पळणे, जाणे, चढणे, बसणे, उभे राहणे यांपैकी कोणत्याही क्रियावाचक शब्दास. | | १ |
| | ई) योग्य शीर्षकास १ गुण देण्यात यावा. उदा : खार, सुंदर खार, गोजिरवाणी खार इ. प्रकारचे योग्य शीर्षक लिहिल्यास. | | १ |
| प्र. ९) | **सूचनेप्रमाणे कृती कर.** | 04.01.17 | ३ |
| | अ) केवढी उंच ही इमारत! वाक्याच्या शेवटी उद्‌गारवाचक चिन्ह दिल्यास. | | १ |
| | आ) दिलेल्या विरामचिन्हांचा वापर करून अर्थपूर्ण वाक्य लिहिल्यास.<br>[ , ] : जसे : बागेत गुलाबाची, मोगऱ्याची फुले आहेत.<br>वाक्यात स्वल्पविराम या चिन्हाचा योग्य वापर करून वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>[ ? ] : अचूक प्रश्नार्थक वाक्यास एक गुण द्यावा.<br>वाक्यात प्रश्नचिन्हाचा योग्य वापर करून वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| प्र. १०) | **खाली दिलेल्या चित्रावरून संवाद लिही.** | 04.01.18 | ५ |
| | चित्रातील चिमणी व छोटा मुलगा यांच्यातील संवाद तुझ्या कल्पनेने सहा ते आठ वाक्यांत लिहिणे अपेक्षित आहे.<br>• सहा ते आठ वाक्ये संवाद लिहिल्यास ५ गुण द्यावे.<br>• पाच ते सहा वाक्ये अर्थपूर्ण संवाद लिहिल्यास ४ गुण द्यावे.<br>• तीन ते चार वाक्ये अर्थपूर्ण संवाद लिहिल्यास ३ गुण द्यावे.<br>• दोन वाक्यांत अर्थपूर्ण संवाद लिहिल्यास २ गुण द्यावे.<br>• एक वाक्य लिहिल्यास १ गुण. | | ५ |

■■■